**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे**

**प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमालेचे २७ व २८ जुलै रोजी आयोजन**

अमरावती - (दि. २०.०७.२०२२)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने स्व. वासुदेवराव राजारामजी देशमुख यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून 'प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज' व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प बुधवार दि. २७ जुलै, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे आयोजित करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेच्या प्रथम पुष्पाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे भूषविणार असून 'प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज' या विषयावर अमरावतीच्या सुप्रसिद्ध वक्त्या डॉ.सौ. नयनाताई कडू अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. प्रथम पुष्पाला श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे व दानदात्यांचे प्रतिनिधी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प गुरूवार, दि. २८ जुलै, २०२२ रोजी दुपारी १२.०० विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित करण्यात आले आहे. अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे भूषविणार असून 'समन्वयमहर्षि संत श्री गुलाबराव महाराज' या विषयावर अमरावतीच्या सुप्रसिद्ध वक्त्या डॉ.सौ. नयनाताई कडू अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. द्वितीय पुष्पाला श्री विद्याभारती शैक्षणिक मंडळ, अमरावतीचे अध्यक्ष श्री रावसाहेब शेखावत, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे व दानदात्यांचे प्रतिनिधी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

अकोला व अमरावती येथील व्याख्यानमालेकरिता सर्व नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहून व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचे प्राचार्य डॉ.ए.एल. कुलट व विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ.सौ. प्रज्ञा येनकर यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २०/०७/२०२२.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2022 174

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/